**<u>झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण मुंबई</u>**
**झोपडपट्टी पुनर्वसन योजनांचे प्रस्ताव झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने संगणक प्रणालीमार्फत स्विकारण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**गृहनिर्माण विभाग**
**शासन निर्णय क्र. झोपुयो-१२०३/प्र.क्र.१२४/२०१७/झोपसु-१**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- २७ जुलै, २०१७

**<u>प्रस्तावना</u> :-**

महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र (सु.नि.व पु.) अधिनियम, १९७१ च्या कलम ३(B) नुसार आणि इतर अनुषंगिक तरतुदीनुसार तसेच बृहन्मुंबई विकास नियंत्रण नियमावली, १९९१ मधील विनियम ३३(१०) परिशिष्ट-४ मधील विविध तरतुदीनुसार झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, मुंबई यांच्याकडून झोपडपट्टी पुनर्वसन योजनांचे प्रस्ताव विहित नमून्यात पूरक दस्तऐवजासह दाखल करुन घेतले जातात. अशा प्रस्तावांची परिशिष्टनिहाय छाननी प्राधिकरण स्तरावर विविध विभागामार्फत केली जाते. तसेच अशा प्रस्तावातील प्रारुप परिशिष्ट-२ झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडून पडताळणीसाठी संबंधित सक्षम प्राधिकाऱ्यांकडे पाठविले जातात. झोपडपट्टी पुनवर्सन प्राधिकरणातील विविध विभागांद्वारे सदर दाखल झालेल्या प्रस्तावांची छानननी होणे आणि सक्षम प्राधिकाऱ्यांकडून परिशिष्ट-२ विहित कालावधीत प्रमाणित होणे यामध्ये समन्वयाचा अभाव व होणारा कालापव्यय या कारणांनी झोपडपट्टी पुनर्वसन योजनांचे प्रस्ताव रेंगाळतात. तसेच मानवी हस्तक्षेपामुळे त्यातील अंमलबजावणीत देखिल सुसूत्रता राहात नाही. झोपडपट्टी पुनर्वसन योजनांचे विकासकांकडून दाखल होणारे प्रस्ताव परिपूर्ण, अचूक असावेत व त्यांची तपासणी विहित कालावधीत मानवी हस्तक्षेपाशिवाय पारदर्शकपणे व्हावी या हेतूने हे प्रस्ताव संगणकीय प्रणालीद्वारे झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने स्विकारण्यासाठी संगणकीय प्रणाली विकसित करावी असा प्रस्ताव शासनाच्या विचाराधिन होता.

**<u>शासन निर्णय</u> :-**

महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र (सु.नि.व पु.) अधिनियम, १९७१ च्या कलम ३(B), बृहन्मुंबई विकास नियंत्रण नियमावली, १९९१ मधील तरतुदीनुसार तसेच झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने वेळोवेळी

विहित केलेल्या कार्यपध्दतीनुसार विकासकांकडून झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे दाखल होणारे झोपडपट्टी पुनर्वसन योजनांचे सर्व प्रस्ताव पूर्णपणे संगणकीय प्रणालीद्वारे स्विकारले जातील. झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, मुंबई यांनी त्यांच्या संकेत स्थळावर यासाठी आवश्यक ती संगणकीय प्रणाली विकसित करावी.

संगणकीय प्रणाली विकसित करुन प्रत्यक्ष कार्यान्वयन होईपर्यंत प्रचलित कार्यपध्दती चालू राहिल. मात्र अशा प्रकारे दाखल होणारे सर्व प्रस्ताव संगणकीय प्रणालीवर योग्य पध्दतीने समाविष्ट करण्याची जबाबदारी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणावर राहील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करुन देण्यांत आला असून, त्याचा संकेतांक क्र. २०१७०७२७१२४०५९३५०९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Baliram Pawar

Digitally signed by Baliram Pawar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Housing Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=befef6531a9fedce4a48730f8247a42dc24c79ec385832aa53bf063e6d139980, cn=Baliram Pawar
Date: 2017.07.27 12:46:39 +05'30'

**( बळीराम पवार )**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा. राज्यपाल यांचे सचिव
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव व सचिव
३. मा.सभापती, विधान परिषद/मा.अध्यक्ष, विधानसभा
४. मा.विरोधी पक्षनेता विधान परिषद/मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा
५. मा.सर्व विधानसभा आणि विधान परिषद सदस्य
६. मुख्य सचिवांचे सह सचिव
७. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरीक्षा), महाराष्ट्र-१, मुंबई.
८. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरीक्षा), महाराष्ट्र-२, नागपूर.
९. महाअधिवक्ता, मुंबई उच्च न्यायालय, मुंबई.
१०. शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव ,
११. सर्व महानगरपालिका आयुक्त,
१२. महानगर आयुक्त, मुंबई महानगर व प्रदेश विकास प्राधिकरण, वांद्रे (पूर्व), मुंबई
१३. उपाध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व),मुंबई-५१
१४. मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण,मुंबई/पुणे-चिंचवड क्षेत्र/नागपूर

१५. विशेष कार्य अधिकारी, धारावी पुनर्विकास प्रकल्प, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व) मुंबई- ५१
१६. सर्व विभागीय महसूल आयुक्त,
१७. संचालक, नगरपालिका प्रशासन, मुंबई.
१८. जिल्हाधिकारी, मुंबई शहर/मुंबई उपनगर जिल्हा
१९. अपर जिल्हाधिकारी (अति/निष्का) मुंबई शहर/पश्चिमउपनगर/पूर्व उपनगरे
२०. मुख्य अधिकारी, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व) मुंबई ४०० ०५१
२१. गृहनिर्माण विभागातील सर्व सहसचिव/उपसचिव/अवर सचिव/कक्ष अधिकारी
२२. निवड नस्ती (झोपसु-१), गृहनिर्माण विभाग.